माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ६०२७+६०२८ / २०२३ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| अमोल हनुमंत मोरे | मुख्याध्यापक, अमृता विद्यालय बनेश्वर, मु.पो.नसरापूर, ता.भोर, जि.पुणे | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती भोर, जि.पुणे |

**( सुनावणी दिनांक - १८/०६ /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.२७.०९.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये २ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| द्वितीय अपील क्र . | माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|---|
| ६०२७ | १६.०६.२०२३ | सन २०२३ शैक्षणिक वर्षात आपल्या शाळेकडून आर टी इ अंतर्गत किती प्रवेश दिले त्याची पात्र यादी मिळावी. |
| ६०२८ | १६.०६.२०२३ | आपल्या कार्यालयाअंतर्गत आर टी इ साठी अमृता विद्यालय बनेश्वर नसरापूर साठी किती अर्ज आले व त्यातुन लाभार्थी विद्यार्थ्याची निवड करताना जी कायदेशीर विहित प्रणाली अवलंबून यादी मंजूर केली त्याची पात्र यादी मिळावी. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, "अपिलार्थीला दि.२०.०६.२०२३ च्या पत्राने माहिती दिली आहे तसेच त्यांना मोबाईल व्हॉट्सअॅप द्वारे माहिती दिली आहे."

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, "अपिलार्थीनी प्रथम अपिल केले आहे ते आमच्याकडे प्राप्त नाही."

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीला दि.२०.०६.२०२३ च्या पत्राने माहिती दिली आहे तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती संकेत स्थळावर उपलब्ध असल्याने, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुतचे २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ६०२७ +६०२८ / २०२३ / पुणे 9130/2025 दिनांक - 2/9/2025